

# माझा कुणा म्हणूं मी?





परचुरे

लेखक • दत्ता केशव



# माझा कुणा म्हणू मी ?

लेखक

दत्ता केशव

PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN CULTURE
Date.......
ESTD. 1981

प्रकाशन क्रमांक
३५६

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
मुंबई ४

मूल्य पांच रुपये

© या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, रूपांतराचे, पटकथेचे, नभोनाट्याचे, पुनर्मुद्रणाचे नि अितर सर्व अधिकार सौ. मंगला दत्तात्रय कुलकर्णी
मनोरमा चाळ, जैन मंदिरासमोर, भायंदर (प. रेल्वे, जि. ठाणे)
यांचेकडे आहेत.
लेखी संमतीविना नाटकाचा प्रयोग कोणीही करू नये.

प्रकाशक :
विष्णु गजानन परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २, गिरगांव,
मुंबअी ४ ( B R )

आवृत्ति दुसरी
३० सप्टेंबर १९७१

मुखपृष्ठ सजावट
श्री. मोहन वाघ

मुद्रक :
ग. मा. सहस्रबुद्धे
श्रीज्ञानेश्वर प्रिंटिंग प्रेस,
३९३/२, 'ई', शिवाजी रोड,
कोल्हापूर.

ज्यांनी मला चित्रपट दिग्दर्शनाची प्रथम
संधी दिली ते माझे निर्माते मित्र
श्री. लालसाहेब
यांना ही कलाकृति प्रेमपूर्वक **अर्पण**

—लेखक

कसलेला नटसंच, कुशल दिग्दर्शन आणि श्री. दत्ता चौडणकरांचे नेपथ्य व सुप्रसिद्ध गायक बालकराम यांचे पार्श्वसंगीत यामुळे प्रयोग अपेक्षेबाहेर कमालीचा रंगला. बाबांची जीवापाड मेहनत सफल झाली. माझ्या बंधूंची इच्छा पूर्ण झाली.

हे नाटक लिहून घेण्यास कारणीभूत आहेत माझे निर्माते मित्र लालसाहेब. तसेच माझे लेखक गुरु श्री. मधुसूदन कालेलकर यांची मला फार मदत झाली आहे. किंबहुना मी असे म्हणेन की "माझा कुणा म्हणू मी ?" या त्रिकोणातल्या तीन कोनांपैकी दोन कोन म्हणजे लालसाहेब व कालेलकर (उरलेला मी) या उभयतांचा मी अत्यंत ऋणी आहे, आभारी आहे.

माझे मित्र प्रभाकर मुजुमदार यांनीही फार बहुमोल सूचना वेळोवेळी दिलेल्या आहेत ह्याची आठवण मला ठेवलीच पाहिजे.

आता आभार मानायचे आहेत जनताजनार्दनाचे. माझ्या दृष्टीने एक अत्यंत अवघड विषय ( Risky ) रसिकांना पसंत पडला तसाच चिकित्सक टीकाकारांनाही आवडला. त्यांच्या रसिकतेबद्दल, मार्मिक गुणग्राहकतेबद्दल आभार. आभार. आभार.

दत्ता केशव
तारीख २०।९।६८



# अंक पहिला

[ भास्करराव परांजपे या वृद्ध पेन्शनर शाळामास्तरच्या घराचे दृश्य. एकंदरीत सजावट त्यांच्या मध्यम वर्गाला शोभेल अशी आहे. स्वयंपाकघराचे बाजूने लता प्रवेश करते. मधल्या टेबलाकडे लक्ष जाते. तिथे दोन पत्रं पडलेली आहेत. ती एक पत्र उचलते. ते फोडलेले आहे. हे बघून तिला संताप येतो. बाहेरून अनंत वर्तमानपत्र घेऊन ओरडत येतो. ]

**अनंत :** लता ए लता ! शुभवर्तमान. आनंदाची बातमी. हे वाच. (पेपर दाखवतो). (ती घुश्श्यात आहे) अहो, वज्रचुडामंडित राजश्री सौभाग्यवती लताबाई, भ्रतार अनंत भास्कर परांजपे तुम्हाला हाक मारतोय, काहीतरी बोला.
**लता :** (घुश्श्यातच) माझं पत्र कुणी फोडलं ?
**अनंत :** पत्र, हे पत्र होय ! (हसतो) हे तर आमच्या सासरेबुवांचं पुण्याहून आलेलं पत्र, तू वाचलं नाही ! (वाचतो) चि. सौ. लतास, अनेक आशीर्वाद. तुझ्या डोहाळे-जेवणासाठी तू आम्हा उभयतांना आग्रहाचे आमंत्रण केलेस परंतु कामामुळे बिलकूल सवड नाही. त्यामुळे कऱ्हाडला येणे शक्य नाही, तरी रागावू नये. (स्वतःशी) प्रवासखर्च वाचवला. (पुन्हा वाचतो) तुझ्या आईचे म्हणणं—तू जेव्हा बाळंतपणाला इकडे येशील त्याच वेळी माहेरचं म्हणून थाटाचं डोहाळे-जेवण करून टाकू. (स्वतःशी) एका दगडात दोन पक्षी. डोहाळे-जेवण आणि बारसं. बाकी सर्व क्षेम. तुझा पिता नारोपंत. काय ग ? वडील येत नाहीत म्हणून रागावलीस ?
**लता :** माझं पत्र तुम्हीच फोडलेलं दिसतेय !
**अनंत :** जाऊ दे ग. साधं पत्र फोडलं म्हणजे काही तिजोरी नाही फोडली किंवा बँक फोडली नाही. बापाचं मुलीला आलेलं पत्र. त्यात प्रायव्हेट काय

असणार ? अग आपल्या पंडित नेहरूंनी त्यांच्या मुलीला लिहिलेली पत्रं छापलीत. आणि पत्र का फोडलं माहीत आहे ?

**लता** : का ?

**अनंत** : बदला घेतला. लग्नापूर्वी मी तुला पाठविलेलं प्रेमपत्र तुझ्या वडलांनी फोडलं होतं.

**लता** : हो पण त्यानं काही तोटा झाला नाही. आपलं प्रेम कळलं त्यांना आणि लगेच लग्न झालं आपलं.

**अनंत** : तेच म्हणतोय मी. मी तुला पाठवलेलं पत्र तुझ्या वडलांनी फोडलं, त्यांनी तुला पाठवलेलं मी फोडलं. फिटंफाट. ए लता, खरं सांगू ?—आज आमचे तीर्थरूप श्वशूर यायला हवे होते. ते नेहमी म्हणतात ना मी काही करत नाही. आळशी आहे. बसून खातो. आज तुझ्या डोहाळे-जेवणाला आले असते म्हणजे माझी कर्तबगारी स्पष्ट दिसली असती त्यांना. ( लता रागाने बघते ) अग हा पेपर वाच. सुवर्णसंधी. पुणे शहरात मध्यवस्तीत एक हॉटेल फक्त दहा हजार रुपयांत विकणे आहे. मी तुझ्या वडलांकडून भांडवल मागायचं ठरवलं होतं. ते हॉटेल मला मिळालं तर दहा हजाराचे दहा लाख करून दाखवले असते दहा वर्षांत. पण जाऊ दे. पुनर्जन्माआधी श्रीमंत होण्याचा योग नाही दिसत. ए, तुझ्या वडलांना पत्र लिहून विचार भांडवलाची सोय होईल का ?

**लता** : शक्य नाही. एकदा हुंडा देऊन फसलेत.

**अनंत** : अँहा, अँहा, हुंडा म्हणजे जसं काही काश्मीरचं राज्य माझ्या झोळीत टाकलंय. की माझ्या लग्नात मुंबई आणि साष्टी बेटं आंदण दिलीत ! दीड हजार रुपये हुंडा.

**लता** : दीड हजार गेले. आणि जन्मभर पश्चात्ताप करायची पाळी आलीय माझ्यावर.

**अनंत** : मग दीड हजारात काय तुला अँबेसीडर नवरा मिळाला असता, की राज्यपाल ? आणि ते दुसरं पत्र नाही वाचलंस, माधवी आणि श्रीधरपंत यताहेत. तुझ्या आजच्या समारंभाला.

( भास्करराव बाहेरून येतात. यांचे लक्ष नाही. )

**लता** : हं, हवी ती माणसं येत नाहीत आणि नको ती—

**अनंत** : लता, काही झालं तरी माधवी माझी बहीण आहे हे लक्षात ठेव. ( बाहेर जाऊ लागतो. लक्ष बाबांकडे जाते ) बाबा, ( निघून जातो )



माझा कुणा

**भास्कर** : सूनबाई, तुझ्या डोहाळे-जेवणाला माधवी आणि जावईबापू येताहेत म्हणून राग आला तुला ?

**लता** : आमच्या रागाला विचारतंय कोण ? वन्संचं सासर मुळीच पसंत नव्हतं माझ्या बाबांना. तरी तो राग आम्ही गिळलाच ना ? बाबांनी चांगलं मुंबईच्या डॉक्टरचं स्थळ आणलं होतं. ते पटलं नाही तुम्हाला.

**भास्कर** : डॉक्टर ? ते स्थळ आवाक्याबाहेरचं होतं. आणि हे स्थळ काय वाईट आहे ? भैयासाहेबांची शेतीवाडी आहे. श्रीधर इंजिनियर आहे. माझ्यासारख्या पेन्शनर मास्तरच्या मुलीचं याहून जास्त कल्याण काय होणार ?

**लता** : कल्याण ? वन्संच्या लग्नासाठी राहातं घर मारवाड्याकडे गहाण टाकलंत आणि म्हणे कल्याण.

**भास्कर** : सूनबाई, माधवीचं लग्न जमत नव्हतं. कुठं पत्रिका आड यायची—कुठं हुंडा. मी तरी काय करणार होतो ? पेन्शन अपुरी पडते म्हणून पार्टटाईम नोकरीही धरली तरी-तरीसुद्धा घर गहाण टाकावं लागलं. नाइलाजानं. त्यातून अनंताला नोकरी असती तर—

**लता** : येऊन जाऊन त्यांच्या नोकरीचं तुम्हाला खुपतंय. शंभरदीडशे रुपये मिळविण्याऐवजी मोठं व्यापारी बनावं, श्रीमंत व्हावं हे ध्येय तुम्हाला सलतंय.

**भास्कर** : ( किंचित् चिडून ) सूनबाई.

**लता** : ( फणकाऱ्याने ) कुठून दुर्बुद्धी झाली बाबांना आणि हा सासुरवास माझ्या नशिबी आला.

**भास्कर** : सूनबाई, मला कळतं तुझं दुःख. आपलं हक्काचं घर गेलं पण परत मिळवू आपण.

**लता** : कशाच्या जोरावर ? का वन्संचा सासरा हे घर सोडवणार आहे लक्ष्मीसारखी सून मिळाली म्हणून ?

**भास्कर** : शांत हो सूनबाई, आज केवढ्या आनंदानं माधवी इथं येईल. सासरची सुखदुःखं तुझ्याशिवाय कुणाला सांगणार ती ? लक्ष्मी असती तर आईच्या मायेनं तिनं जवळ घेतलं असतं तिला. आज तू आई होऊन तिचं स्वागत करायला हवंस.

**लता** : स्वागत ? मला काय जरुरी आहे ? आम्हाला दुःखात टाकणाऱ्या कारणाचं आपण होऊन स्वागत करण्याची ? जो काटा पायात खुपलाय त्याला फूल म्हणून वेणीत खोवायची रीत मी शिकले नाही.

म्हणू मी ?

**भास्कर :** माधवीला तू काटा समजावंस यापरतं दुःख नाही दुसरं. पण सूनबाई, त्या काट्याबरोबर फूल पण येणार आहे. त्या फुलासाठी सहन कर थोडा वेळ काट्याचा त्रास. जावईबापूंच्या देखत आपली घरची भांडणं काढू नकोस. माधवीला हा घराचा प्रकार माहीत नाही. तो तिला समजता उपयोगी नाही. (बाहेरून माधवीची हाक—बाबा) माधवी आली वाटतं ? सूनबाई, तिला ओवाळायला तुकडा आण.

**लता :** ओवाळून आरती करण्याइतका काही पराक्रम केला नाही वन्संनी.

**भास्कर :** म्हणून काय झालं ? तिला काय वाटेल ? श्रीधरपंतांना काय वाटेल ?

**माधवी :** (येत) बाबा (तिच्या हातात एक पिशवी)

**भास्कर :** माधवी, थांब. दारातच थांब. सूनबाई (लता आत निघून गेलेली आहे) थांब माधवी. ती ओवाळायला आत गेली असेल. सूनबाई (म्हणून आत जातात) (श्रीधर येतो. त्याच्या हातात बॅग वगैरे. माधवी उंबरठ्यात उभी आहे. आत येणाऱ्या श्रीधरला ती अडवते.)

**श्रीधर :** हे काय ? आत जायचं नाही ?

**माधवी :** (चेष्टेच्या सुरात) नाही.

**श्रीधर :** का ?

**माधवी :** हुकुमाशिवाय आत येण्याची सक्त मनाई आहे.

**श्रीधर :** कुणाची ?

**माधवी :** माझी ?

**श्रीधर :** बायका सासर सोडून माहेरच्या उंबरठ्यावर उभ्या राहिल्या की बदलतात हे खरं म्हणायचं. अरे वारे हुकूमशाही (तो आत जाऊ लागतो. ती अडवते.)

**माधवी :** परवानगीशिवाय प्रवेश नाही म्हणजे नाही.

**श्रीधर :** बरं सरकार. एक गरीब नवरा तीस मैल प्रवासाहून थकून आलाय त्या बिचाऱ्याला आपल्या बायकोबरोबर आत येण्याचा हुकूम मिळेल काय ?

**माधवी :** काय नाव तुमच्या पत्नीचं ?

**श्रीधर :** असं. म्हणजे तुझं नाव घ्यावं म्हणून ही अडवणूक होय ? (माधवी खुषीनं हो म्हणते) बरं बुवा, घेतो नाव. अगदी उखाण्यात घेतो. एक इंजिनियर ज्याला जिच्या प्रेमासाठी कवी. (तिचा हात धरून) ती माझी बायको नाव दिलं माधवी. आता तरी द्याल ?



**माधवी :** (हात सोडवून घेत) ऊं, हूं (श्रीधर आत जातो).

**श्रीधर :** मग ऐका हो ऐका. सासरचा माल माहेरी पोचता केलाय. पोचपावती द्या म्हणजे हमाल परत जाईल.

**माधवी :** इश्य. अहो, वैनी ओवाळेल. मग आत जायचं असतं.

**श्रीधर :** का ?

**माधवी :** बाहेर कुणाची नजर लागली असेल तर ती बाधू नये म्हणून.

(क्षणभर स्तब्धता दिसते. भास्करराव पाण्याचा तांब्या आणि तुकडा हातात घेऊन येतात. स्वतः तुकडा ओवाळतात. पायावर पाणी ओततात. सारंच विलक्षण अवघडल्यासारखं झालंय.)

**माधवी :** (नमस्कार करत) बाबा.

**श्रीधर :** (नमस्कार करत) बाबासाहेब.

**भास्कर :** सौभाग्यवती भव. शतायुषी भव.

**माधवी :** (त्यांच्या हातातला तांब्या घेत) बाबा तुम्ही ?

**भास्कर :** (भानावर येत) अग, सूनबाईला चक्कर आल्यासारखी झाली म्हणून. तू वाईट वाटून घेऊ नकोस. अरे मी बोलतच काय बसलोय ? तुम्हाला हातपाय धुवायचे असतील, चहा घ्यायचा असेल, प्रवासाहून थकून आला असाल तुम्ही ?

**श्रीधर :** छे. तीस मैलांचा तर प्रवास आणि तोही स्कूटरवर बसून.

**भास्कर :** स्कूटर ?

**माधवी :** बाबा, तुम्हीच नाही का आमच्या लग्नात प्रेझेंट दिलीत ? मामंजी म्हणत होते उगीच त्रास घेतलात म्हणून.

**भास्कर :** वा, असं कसं ? यांनी हुंडा नाही घेतला. मानपानाचा हट्ट नाही धरला. मग मला काही करायला नको होतं का ? म्हणून स्कूटर दिली.

**लता :** (येत) आणि घर ? (भास्करराव चपापतात)

**माधवी :** (तिला बिलगते) वैनी, वैनी, अग तुला चक्कर आली होती ना ? मग बाहेर कशाला आलीस ? तू विश्रांती घे. मी सगळी कामं करते. बरं का वैनी, मी ठरवलंय तुला मुलगा झाला तर त्याला भाचा नाही समजणार. धाकटा भाऊच समजेन. त्याचं कोडकौतुक करीन.

**लता :** (थंडपणे) तोपर्यंत राहाणार आहात इथं ?

**माधवी :** वैनी ?

**लता :** ( सावरून ) नाही. मग बोलू की सावकाश या सुखाच्या गोष्टी. आता मी जरा बाण्याकडे जाऊन येते.

**माधवी :** तू कशाला जातेस उन्हाची ? काही आणायचं असलं तर मी जाऊन आणू का ?

**लता :** नको. हल्ली सावली आणि ऊन यात फरक वाटत नाही. तुमचं लग्न झालं आणि हक्काची सावली सोडून गेलीय आम्हाला. ( वराकडे पाहाते )

**भास्कर :** ( तिनं बोलू नये म्हणून ) सूनबाई.

**लता :** ( सावरून ) सावली म्हणजे तुम्ही हो. तुम्ही गेल्यापासून सगळं रखरखीत उजाड वाटायला लागलंय. आता तुम्ही आलात. हक्काची छाया आली. थोडा वेळ उन्हात जाऊन आले तर काय बिघडणार आहे ? येते मी. ( ती जाते )

**माधवी :** बाबा, वैनीला बरं नाही का हल्ली ?

**भास्कर :** अँ-हो. दोन जीवांची झालीय ती. शिवाय घरकाम, ही दगदग. त्यामुळे क्वचित् चिडते. रागावते. पण तू मनावर घेऊ नकोस.

**माधवी :** बाबा, असं का म्हणता ? आजपर्यंत माझ्या वागण्यात काही चुकलं का ?

**भास्कर :** नाही बेटा. तुझ्या दैवाचं चुकलं. इतकं थोर अंतःकरण घेऊन माझ्यासारख्या गरीब बापाच्या घरी जन्म घेतलास.

**श्रीधर :** बाबासाहेब.

**भास्कर :** ओ बसा श्रीधर—मी चहा आणतो.

**माधवी :** बाबा, तुम्ही कशाला ? मी चहा आणते.

**भास्कर :** अग सूनबाईनं करून ठेवला असेल. नुसता गाळून आणायचा. आता आणतो. ( ते आत जातात. माधवी ते गेले तिकडे पाहाते. श्रीधर खाकरतो. )

**श्रीधर :** माहेरी पाऊल टाकलं की नवरा आणि सासरची माणसं यांना बायका विसरून जातात हे खरं तर. तसं तीन तास झाले तू मला विसरून गेली आहेस.

**माधवी :** तीन तास ? म्हटलं एक तासापूर्वी आपण घर सोडलंय.

**श्रीधर :** पण तुला जवळ घेऊन सोडल्याला—( तिला जवळ घेत )

**माधवी :** ( बाजूला होत ) चला चहाटळ कुठले. मी समोर आहे म्हणून कौतुक. एकदा दृष्टिआड झाले की—

**श्रीधर :** चूक. एकदम चूक. लग्न होण्यापूर्वीचे आर्जवाचे दोन महिने आणि लग्नानंतरचा हा एक महिना हे तीन महिने नव्वद दिवस आठव. श्रीधर माधवीला विसरलाय. असा एक क्षणही मिळणार नाही. त्यानं या तीन



महिन्यांत कविता केल्या असतील त्या माधवीच्या सौंदर्याबद्दलच्या. तिच्याविषयी वाटणाऱ्या भावनेबद्दलच्या. ती दृष्टिआड झाली की तिच्यामुळे झालेल्या विरहयातनेबद्दलच्या.

**माधवी :** इतकं प्रेम करता तुम्ही माझ्यावर ?

**श्रीधर :** शंका वाटते ? खात्री करून देऊ ? ( तोंड तिच्या तोंडाकडे नेतो )

**माधवी :** नको ! आग भडकलेली दुरूनसुद्धा कळते. त्यासाठी आगीत जाऊन खात्री कशाला करायची ?

**श्रीधर :** विरहाची आग वेगळी असते. तुला त्याचा अनुभव नाही. मला आहे आणि आजपासून चार वर्षं पुन्हा त्याचा अनुभव घ्यायचाय.

**माधवी :** चार वर्षं ? मी तर चार दिवसांनी परत येणार आहे म्हटलं.

**श्रीधर :** हो ना. चारच दिवस. प्रत्येक दिवस आणि रात्र वर्षासारखी लांब वाटेल माधवी. ही चार वर्षं ? ( सुस्कारा सोडतो )

**माधवी :** च् च् च् सहज संपतील. दिवसा आपल्या कामात ध्यान द्यावं. संध्याकाळी दोनचार मैल फिरून यावं. रात्री देवाची स्तोत्रं वाचावीत आणि झोपून जावं. बस्.

**श्रीधर :** म्हणे बस. उपाशी पोटी झोप लागते वाटतं ?

**माधवी :** एक दिवस उपास केला की आठवडाभर चांगलं आरोग्य राहतं. अजीर्ण होत नाही.

**श्रीधर :** पुरे पुरे. इतके दिवस मी तुला जादुगारीण समजत होतो. आता कळलं की तू डॉक्टरीण व्हायला हरकत नाही. मग त्या कुणा डॉक्टरशी का नाही लग्न केलंस ?

**माधवी :** करणार होते. पण दया आली.

**श्रीधर :** कुणाची ?

**माधवी :** एका इंजिनियरची.

**श्रीधर :** दया आली ? म्हणजे तुझं माझ्यावर प्रेम नव्हतं ?

**माधवी :** नाही.

**श्रीधर :** मी तुला आवडत नाही ?

**माधवी :** मुळीच नाही. ( श्रीधर रुसतो ) उगीच इंजिनियर असताना कवी झालात. तुम्हाला स्त्रीचं मन कळलंच नाही. ती जेव्हा नाही नाही म्हणते तेव्हा त्याचा अर्थ होयं असा असतो.